**स्थायी निदेश क्र.४०**

व्यावसायिक सेवा ठोक पध्दतीने उपलब्ध करण्याबाबत.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
क्र: नपप्रसं/लेपआ/२००६/प्र.क्र.८५४/व्यावसायिक सेवा/ ४३
दिनांक : २० सप्टेंबर, २००६

वाचा : या संचालनालयाचे स्थायी निर्देश क्र. नप्रस/ निविदा मागविणे/०५/प्र.क्र.१५१/०५/९, दि. २९ डिसेंबर, २००५

प्रस्तावना :

नगरपरिषदांच्या आस्थापनेवर तांत्रिक कर्मचारी नसल्यास या संचालनालयाच्या स्थायी निदेंश क्र. ३६ दि. २९/१२/२००६ मधील परिच्छेद क्र. १६ नुसार व्यावसायिक सेवा ठोक पध्दतीने उपलबध करुन घ्यावी असे या संचालनालयाचे समक्रमांकाचे दि: २१ ऑगस्ट २००६ च्या पत्राने सर्व नगरपरिषदांना कळविण्यात आले आहे.

०२. नगरपरिषदांच्या आस्थापनेवर तांत्रिक अधिकारी असतील तर स्थायी निदेंश क्र.३६ दि. २९/१२/२००६ मधील परिच्छेद क्र. १६ नुसार व्यावसायिक सेवा ठोक पध्दतीने उपल्बध करता येईल काय याबाबत विचारणा होत आहे त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ) ज्या नगरपरिषदांमध्ये तांत्रिक कर्मचारी वर्ग आहे अशा नगरपरिषदांमध्ये नियमित स्वरुपाची नवीन कामे, दुरुस्ती कामासाठी व्यावसायिक सेवा ठोक पध्दतीने घेण्यात येवू नये . या कामांचे आराखडे, रेखांकन, कामावर देखरेख इ. कामे नगरपरिषदांच्या अभियंत्याकडून करण्यात यावीत. .

ब) फक्त अपारंपारीक /वैशिष्टयपुर्ण कामे हाती घेतली असतील तर अशा कामांसाठी काही तांत्रिक कामे जसे वास्तु आराखडा / वास्तु संकल्पन (Structural design/ Conceptional design) यासाठी बाहेरील व्यवसायिक तांत्रिक सल्लागार नेमण्यात यावेत. या सेवा उपलब्ध करण्यासाठी निविदा व संविदा करताना या कामाची एकूण किंमतीवर शतमान पध्दतीने (on percentage basis) निविदा मागविण्यात येवू नये. कामाचे स्वरुप व व्याप्ती विचारात घेवून ठोक पध्दतीने (lump sum) दर मागविण्यात येऊन संविदा करण्यात याव्यात. या कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, निविदा व संविदा करणे, कामाचे मोजमाप घेणे, देयक तयार करणे, इ. कामे ही नगरपरिषदेतील कार्यरत नियमित अभियंत्याकडून करण्यात यावीत.

क) ज्या नगरपरिषदांमध्ये तांत्रिक कर्मचारी वर्ग नाही अशा नगरपरिषदांमध्ये तांत्रिक अधिकारी वर्ग उपलब्ध होईपर्यंत या संचालनालयाच्या स्थायी निदेंश क्र. ३६ दि. २९/१२/२००६ मधील परिच्छेद क्र. १६ नुसार व्यावसायिक सेवा ठोक पध्दतीने उपल्बध करुन घेण्यांत यावी.

०३. उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे याची दक्षता घेण्यात यावी. मुख्याधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा विभागीय स्तरावरील बैठकीमध्ये घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(सुनील सोनी )
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रत.

१. मुख्याधिकारी नगरपरिषद (सर्व), २. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व )
३. जिल्हाधिकारी ( सर्व ), ४. उपमुख्य लेखापरिक्षक स्थानिक निधी लेखा कार्यालय विभाग (सर्व)
५. मुख्य लेखापरिक्षक स्थानिक निधी लेखा कार्यालय विभाग (सर्व)